# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १७.०६.२०२३ शनिवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक पथकाची कामगिरी**

दिनांक ३१.०८.२०२० चे ११:३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत राहणाऱ्या ४५ वर्षीय महिला फिर्यादी हयांनी त्यांची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही कॉलेजला ॲडमिशन करायला जाते असे सांगून घरून निघून गेली ती परत आली नाही तिचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. तिला कुणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरून दि. ०१.०९.२०२० पोलीस ठाणे कपीलनगर येथे कलम ३६३ भादवी अन्वये दाखल करण्यात आला. अपहृत मुलीचा शोध न लागल्याने नमुद गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा येथे वर्ग करण्यात आला.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक पथकाने आरोपी व अपहृत मुलीला शोधणे करीता विवीध प्रकारे प्रयत्न केले तसेच गोपनिय माहीती व तांत्रीक पध्दतीने तपास करून उपलब्ध माहीतीच्या आधारे अपहृत मुलगी व आरोपीचा शोध घेणेकामी, रिधोरा जि. अकोला येथे जावून चौकशी केली असता अपहृत मुलगी मिळून आली. तिने संशयीत आरोपी सन्नी सुनिल वाकोडे सोबत लग्न केले अशी माहीती दिली. नमुद माहीतीच्या अनुशंगाने अपहृत मुलीला घेवून अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथक गुन्हे शाखा येथे १६.०६.२०२३ ला हजर झाले. व पुढील कारवाईस्तव सदर अपहृत मुलीला गुन्हयाच्या मुळ डायरीसह पोलीस ठाणे कपीलनगर यांचे स्वाधीन केले.

वरील गुन्हा उघडकीस आण्याची कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) संजय पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) मुमक्का सुदर्शन, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रभारी संजय जाधव यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान बजबळकर, मपोउपनि. लक्ष्मीछाया तांबुसकर, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर ढोके, मनिश पराये, दिपक बिंदाने, नापोअ. शरीफ शेख, ऋशीकेष डुमरे मनापोअ आरती चौहान, अश्विनी खोडपेवार, यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे धंतोली :— विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक**

सन २०२२ ते दिनांक १५.०६.२०२३ चे १९.०० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे धंतोली हद्दीत राहणाऱ्या २२ वर्षीय फिर्यादी महिला हीला ओळखीचा आरोपी नामे महेश राजु वानखेडे वय २३ वर्ष, रा. धंतोली, नागपूर, याने फिर्यादीला विनाकारण फोन करून तसेच मॅसेज करून, फिर्यादीचे ईच्छेविरूध्द तिचा पाठलाग करीत होता आरोपी हा फिर्यादीस बोलण्यासाठी जबरदस्ती करीत होता. तसेच आरोपीने फिर्यादीस पोलीस ठाणे धंतोली हद्दीत माझे सोबत लग्न कर असे जबरदस्ती करून लग्न न केल्यास फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी देवुन फिर्यादीचे पतीला मारण्याची धमकी दिली. व आरोपीने फिर्यादीचे मनास लज्जा येईल असे अश्लील कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि गाठे ७८७५६९३०७७ यांनी आरोपी विरूध्द कलम ३५४(ड), २९४, ५०६ भा.दं.वी कायदाअन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर : — प्राणांकीत अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक १४.०६.२०२३ चे २३.०० वा. ते दि. १५.०६.२०२३ चे ०२.१५ वा चे दरम्यान पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत विनोबाभावे नगर ते कळमणा पुलाकडे पायदळ जाणारे देवीदास गुलाबराव थेटे वय ४० वर्ष रा. कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर यांना ते रोड क्रॉस करीत असता. आरोपी एका लाल रंगाचे कार चालकने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यांना धडक मारून गंभीर जखमी करून पळुन गेला. जख्मी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल वार्ड क्र. ३९, येथे दाखल केले असता डॉक्टरांनी उपचारादरम्यान दि. १५.०६.२०२३ चे ०२.१५ वा. तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि पारोडे ९८८१९८९००४ यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम ३०४(अ), २७९, भा.दं.वी सहकलम १३४, १७७ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेत आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे गणेशपेठ :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल**

दिनांक ०४.०९.२०२१ ते दि. १६.०६.२०२३ चे २०.०० वा. दरम्यान पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत सुभाष रोड, कॉटन मार्केट, सैगेरीस इम्पैक्स कंपनी येथील आरोपी १) श्रीमती सुजाता मालेवार वय ३८ वर्ष २) साईकुमार जयकांत जयस्वाल दोन्ही रा. सुभाष रोड, कॉटन मार्केट यांनी संगणमत करून फिर्यादी दुर्गेशकुमार श्रीगोपाल नागोरी वय ५३ वर्ष रा. २२, क्यून्स क्लोज, युनिट १२/१५७, सिंगापूर यांचे सोबत कार्यालयातुन सोयाबीन व्यापाराबाबत २१० मॅट्रीक टन सोयाबीन भारतीय चलनात किमती १ करोड ५६ लाख ८२ हजार ८८५ रूपयाचे खरेदी बाबत करार केला. फिर्यादीने कार्गोने मुबई येथे माल पाठविला प्रकीया पुर्ण झाले नंतर आरोपींनी फेब्रुवरी २०२२ मध्ये संपुर्ण सोयाबीन आपले ताब्यात घेतले व ते कुपवाडा, सांगली एम.आय.डी.सी येथील राधेकृष्ण एक्सट्रॅक्सन प्राय.लिमी यांना विकले आरोपींनी करारा प्रमाणे माल विक्री केल्या नंतर फिर्यादीला मालाची रक्कम देणे अपेक्षीत होते परंतु आरोपींनी फिर्यादीस मालाचे रकमेचे एकुण १,५६,८२,८८५ /— रू न देता फिर्यादीची फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून व अर्जाचे चौकशीअंती पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि राउत ९९६०५७२२७७ यांनी आरोपीविरूद्ध कलम ४२०, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीचा शोध घेत आहे. पुढील तपास सुरू आहे.

## ( अकस्मात मृत्यु )

**१) पोलीस ठाणे कोराडी** :— दिनांक १६.०६.२०२३ चे २३.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कोराडी हद्दीत सावनेर नागपूर हायवे वरील ओव्हरब्रिज वरून खाली रेल्वे लाईनचे मध्य भागी उडी घेवुन लालचंद रामफेर गुप्ता वय २६ वर्ष रा. शाहु किराणा जवह, ताज नगर झोपडपट्टी, मानकापूर हा खाली पडल्याने गंभीर जख्मी झाला पोलीसांनी त्यांस उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी शरद हरिश नायक वय ३० वर्ष रा. शबीला को ऑप. सोसा. प्लॉट न. १३३, नारा रोड कोराडी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि कलोडे ८८३०६४१४०४ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी** :— दिनांक १६.०६.२०२३ चे १०.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत अंबाझरी तलावाचे पाण्यात एक ईसम तरंगतांना मिळुन आले फायरब्रिगेडचे सहाय्याने पाण्या बाहेर काढले. फिर्यादी यांनी त्यांची ओळख पटविली त्याचे नाव मोहम्मद युसूफ रजा मोहम्मद शरीफ रिजवी वय २० वर्ष, रा. डोबी नगर, मोमीनपूरा, तहसिल असे सांगीतले. त्याला उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

यात्रकरणी फिर्यादी मो. शरीफ रिजवी अब्दुल सत्तार वय ४५ यांनी, दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि शिंदे ९८५०३४८७६३ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :— सौ. दिपा संदेश लांमसोंगे वय ३५ वर्ष,** रा. प्लॉट न. ३३३/सी, आकाश नगर, हुडकेश्वर, नागपूर हया दिनांक १४.०६.२०२३ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन राहते घरी कोणाला काहिही न सांगता निघुन गेल्या, परत आल्या नाही, शोध घेतला मिळुन आल्या नाही . **<u>वर्णन</u>** — रंग —गोरा, चेहरा — लांब, बांधा— सडपातळ, केस— काळे, उंची— ५ फुट ३ इंच, अंगात— ग्रे रंगाचा सलवार व स्काय ब्लू रंगाची ओढणी घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



**दिपा**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर.**